नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३५१ Issue - 351 | वार गुरुवार दि. १४ मे २०२६ Blow- Thursday Date 14 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## अक्कलकोट येथे चार महामार्गांचे आज भूमिपूजन

### नाशिक- अक्कलकोट, वळसंग-मोहोळ, वागदरी-अक्कलकोट, अक्कलकोट-तोळणूर मार्गाचा समावेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
प्रतिनिधी/अक्कलकोट



अक्कलकोटसह सोलापूर जिल्ह्याच्या दळणवळण आणि औद्योगिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या चार महामार्गांच्या प्रकल्पांचे भूमिपूजन आज , १४ मे रोजी संध्याकाळी ५ वाजता अक्कलकोट नविन बस स्टैंड येथे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली.

सूरत चेन्नई महामार्गाचा भाग असलेल्या नाशिक-अक्कलकोट महामार्गासह वळसंग-मोहोळ, वागदरी अक्कलकोट आणि अक्कलकोट तोळणूर या महत्त्वाच्या मार्गाचे भूमिपूजन होणार आहे. हे महामार्ग पूर्ण झाल्यानंतर अक्कलकोट तालुका राष्ट्रीय स्तरावरील

दळणवळण व्यवस्थेशी अधिक वेगाने जोडला जाणार असून व्यापार, उद्योग, पर्यटन आणि कृषी वाहतुकीला मोठी चालना मिळणार आहे. सूरत चेन्नई ग्रीनफिल्ड एक्स्प्रेस वे हा देशातील महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक मानला जात आहे. गुजरातमधील सूरतपासून तमिळनाडूतील चेन्नईपर्यंतचा हा मार्ग महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशाला जोडणार आहे. या महामार्गामुळे मुंबई-पुणे मार्गावरील वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होणार असून प्रवासाचा वेळही लक्षणीयरीत्या कमी होणार आहे.

नाशिक-अक्कलकोट मार्गामुळे उत्तर महाराष्ट्र आणि दक्षिण महाराष्ट्रातील संपर्क अधिक गतिमान होणार आहे. तसेच वागदरी अक्कलकोट आणि अक्कलकोट तोळणूर मार्गामुळे कर्नाटक सीमावर्ती भागाशी जोडणी मजबूत होणार आहे. मोहोळ वळसंग हा मार्ग तर सोलापूर जिल्ह्यासाठी बाह्यवळण रस्ता म्हणून महत्त्वाचा ठरणार असून शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यास मदत होणार आहे. या महामार्गासाठी हजारो कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून आमदार कल्याणशेट्टी यांच्या पाठपुराव्यामुळे हे प्रकल्प मार्गी लागले आहेत. भूमिपूजन सोहळ्यासाठी जिल्हा प्रशासन, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि स्थानिक यंत्रणांकडून तयारी सुरू असून मोठ्या प्रमाणावर नागरिक उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

### सोलापूर जिल्ह्यातील या प्रकल्पांचे भूमिपूजन

हसापूर ते बडदाल रा.म.क्र. १५० सीचे ग्रीनफिल्ड अलाईनमेंटचे सहापदरीकरण करणे (पॅकेज-१४ अक्कलकोट-कुर्नूल) (लांबी ३६.४० कि. मी. प्रकल्प खर्च १५५२ कोटी) वागदरी- अक्कलकोट-तोळणूर रा.म.क्र. ५४८ बी चे पेव्हड् शोल्डरसहीत दुपदरीकरण (लांबी ४७.६६ कि. मी. खर्च ३५३ कोटी) मोहोळ बसवनगर वळसंग रा.म.क्र. ४६५ चे पेव्हड् शोल्डरसहीत दुपदरीकरण करणे (लांबी ८२ कि. मी. प्रकल्प खर्च ७५६ कोटी) दुधनी येथे रेल्वे उड्डाण पुल बांधणे व ४.१२२ कि. मी. उर्वरित लांबी रा.म.क्र. १५०ई चे उन्नतीकरण व दर्जोन्नतीकरण करणे. (लांबी ४.१२ कि.मी. खर्च ९७ कोटी)

बोरी उमरगे येथे पुल बांधणे (लांबी ०.७५ कि.मी.। प्रकल्प खर्च २६ कोटी)

(एकूण प्रकल्पांची लांबी १७१ कि. मी. एकूण प्रकल्पांचा २७८४ कोटी)

## मुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या अर्ध्यावर



### उच्चस्तरिय बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : इंधन आणि परकीय चलन बचतीच्या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दोन उच्चस्तरिय बैठकीत विविध उपाययोजनांचा आढावा घेतला आणि त्यानुसार काही निर्णय जाहीर केले. या बैठकांना मुख्य सचिव, पोलिस महासंचालक आणि अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत जे प्रमुख निर्णय घेण्यात आले, ते पुढीलप्रमाणे...

मुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या ही तत्काळ प्रभावाने अर्ध्यावर आणण्यात यावी. बाहेरच्या प्रवासात असताना ताफ्यातील वाहनांची संख्या निर्धारित संख्येपेक्षा अधिक नसेल याची जबाबदारी संबंधित पोलिस आयुक्त किंवा पोलिस अधीक्षक यांची असेल. मंत्री-अधिकाऱ्यांनी कोणतेही विदेश दौरे करु नयेत. मंत्र्यांनी अत्यावश्यक नसेल तेव्हा शासकीय विमान, हेलिकॉप्टर यांचा वापर करु नये, त्याऐवजी नियमित विमानसेवेचा वापर करावा. मंत्री-अधिकारी यांनी आवर्जून मेट्रो आदी सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवावा. पहिल्या टप्प्यात किमान एक दिवस असा प्रयोग करावा. अधिकाऱ्यांना बैठकांना बोलावण्याऐवजी व्हीडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून बैठका घ्याव्यात.

शासनात वितरित करण्यात आलेल्या वाहनांचा कोटेकोरपणे आढावा घेण्यात यावा. ऊर्जा बचतीसाठी अनावश्यक होर्डिंग्ज/फ्लेक्सवरील कारवाई वाढवण्यात याव्यात आणि तेथे डेकोरेटिव्ह लायटिंगचा वापर होणार नाही, याची काळजी घेण्यात यावी.



## संपादकीय....

### विद्यार्थ्यांचे नुकसान

गेल्या तीन दशकांत देशातील शिक्षणाचे झालेल्या वस्तूकरण आणि बाजारीकरणाने चिंताजनक वळण घेतले आहे. आकर्षक करिअर असलेले दर्जेदार शिक्षण केवळ धनिकांनाच उपलब्ध करून देणाऱ्या धोरणामुळे विषमता तर वाढतेच; परंतु शैक्षणिक गुन्हेगारीही वाढते आहे. देशातील विविध वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या सुमारे दोन लाख जागांसाठी यंदा जवळ जवळ २३ लाख विद्यार्थ्यांनी नीट परीक्षा दिली. इतक्या मोठ्या संख्येच्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा घेताना, प्रश्नपत्रिका फुटण्यासारखे पारंपरिक गुन्हे होणार नाहीत, याची योग्य ती दक्षता 'एनटीए'कडून का घेतली जात नाही, हा खरा प्रश्न आहे. परीक्षा केंद्रांवर कडक बंदोबस्त ठेवणे, विद्यार्थ्यांची तपासणी करणे वगैरे प्रकार होतात; परंतु 'नीट'साठी मार्गदर्शन करणारे खासगी क्लास आणि यंत्रणेतील हितसंबंधी मंडळी यांच्यातील साटेलोटे का तपासले जात नाही? संशयास्पद क्लासचालकांवर बंदी का घातली जात नाही? प्रश्नपत्रिका फुटणार नाही यासाठी आधुनिक तंत्राचा वापर का केला जात नाही? वैद्यकीय व्यवसायाप्रमाणेच वैद्यकीय शिक्षणाचेही मोठ्या प्रमाणावर खासगीकरण झाले असून, तिची 'बाजारपेठ' तयार झाली आहे आणि अशा बाजारपेठेचे सर्व गुण-अवगुण त्यात उतरले आहेत.

# स्वेरीच्या प्राध्यापकाचा ईशान्येत डंका!!

## स्वेरीचे डॉ. आदित्यकुमार अंशु हे 'उत्कृष्ठ संशोधक पुरस्कार २०२६'ने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी तथा श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये सिव्हील इंजिनिअरिंग विभागात कार्यरत असलेल्या डॉ.आदित्यकुमार अंशु यांना मानाचा 'बेस्ट रिसर्चर अवार्ड २०२६'ने नुकतेच सन्मानित करण्यात आले. स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस), पंढरपूरचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार यांच्या प्रेरणेने व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली डॉ. आदित्यकुमार अंशु यांनी हे यश संपादन केले. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

इटानगर (अरुणाचल प्रदेश) ईशान्य प्रादेशिक विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्था (एनईआरआयएसटी) येथे आयोजिलेल्या स्टीम रिसर्च सोसायटीच्या सहाव्या सत्कार समारंभामध्ये त्यांना या पुरस्काराने सन्मानित केले गेले. स्वेरीच्या डॉ. अंशु यांना हा पुरस्कार शोध, नवीन विचार आणि शैक्षणिक क्षेत्रात दिलेल्या उत्कृष्ट योगदानाबद्दल दिला गेला आहे. या कार्यक्रमासाठी देशाच्या विविध भागातून आलेले अनेक प्राध्यापक, शास्त्रज्ञ, संशोधक उपस्थित होते. या समारंभात डॉ. अंशू यांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. मशीन इंटेलीजन्स फॉर रिसर्च अँड इनोव्हेशन्स (एमएआयटीआरआय -२०२६) या सहाव्या आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्समध्ये या




समारंभाचे आयोजन केले होते. यावेळी परिषदेच्या सर्वसाधारण अध्यक्षा प्रा. डॉ. जॉयत्री बोरा हजारीका यांच्या हस्ते डॉ. अंशू यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी स्प्रिंजरचे कार्यकारी संपादक डॉ.अनिंदा बोस, एसटीईएम रिसर्च सोसायटीचे संस्थापक डॉ.तरूण के. शर्मा यांच्यासह तेथील अधिकारी उपस्थित होते. हा पुरस्कार मिळाल्याबद्धल डॉ. अंशु यांचे संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, इतर विश्वस्त व पदाधिकारी, तसेच संस्थेअंतर्गत असणाऱ्या बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, डी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. सतिश मांडवे, लॉ कॉलेजच्या प्राचार्या डॉ. बनकर, इंजिनिअरींगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे. या पुरस्कारामुळे स्वेरीच्या संशोधन विभागातील संशोधकांचा उत्साह आणखी वाढला आहे, हे मात्र नक्की.

### नाशिक येथे महाराष्ट्र क्रीडा विकास प्रतिष्ठान ची स्थापना

# महाराष्ट्रातील क्रीडा क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी संस्थेची स्थापना : रवींद्र नाईक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी :

खेळाडूंचा सर्वांगीण विकास आणि क्रीडा क्षेत्रातील विविध आव्हानांवर मात करण्यासाठी महाराष्ट्र क्रीडा विकास प्रतिष्ठान ही नवीन संस्था स्थापन करण्याबाबतचा महत्त्वपूर्ण विचार-विनिमय नाशिक येथे पार पडला.

सेवानिवृत्त जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक यांच्या पुढाकाराने हॉटेल रामा हेरिटेज येथे या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत क्रीडा क्षेत्रातील तज्ज्ञ, मार्गदर्शक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून संस्थेच्या भविष्यातील वाटचालीवर चर्चा केली.

खेळाडूंना मिळणार हक्काचे व्यासपीठ खेळ हेच साधना, यश हीच ओळख हे ब्रीदवाक्य समोर ठेवून या प्रतिष्ठानच्या माध्यमातून राज्यातील खेळाडूंना विज्ञानावर आधारित प्रशिक्षण, योग्य मार्गदर्शन आणि उत्कृष्ट कामगिरीसाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे. विशेषतः ग्रामीण आणि आदिवासी भागातील प्रतिभा शोधण्यावर (ढश्रशपीं खवशपंळषळलरींळेप) संस्थेचा भर असेल, अशी माहिती रवींद्र नाईक यांनी दिली.

२२ सूत्री कार्यक्रमावर सविस्तर चर्चा : या बैठकीत संस्थेच्या कार्याची व्याप्ती स्पष्ट करण्यासाठी २२ मुख्य उद्दिष्टांवर चर्चा करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश आहे. प्रशिक्षण आणि साहित्य : खेळाडूंना आधुनिक प्रशिक्षण देणे, क्रीडा साहित्य उपलब्ध करून देणे आणि दुखापतींनंतर पुनर्वसनासाठी मदत करणे. 'स्किल इंडिया मिशन आणि 'एनएसडीसी च्या मान्यतेने खेळाडूंसाठी विविध कौशल्य विकास कोर्सेस आणि करिअर मार्गदर्शन केंद्र सुरू करणे. आधुनिक खेळासोबतच भारतीय पारंपरिक खेळांचा प्रचार आणि प्रसार करणे. पॉडकास्ट, यूट्यूब चॅनेल आणि कम्युनिटी रेडिओच्या माध्यमातून खेळाडूंना प्रसिद्धी मिळवून देणे.

शासनाच्या क्रीडा योजनांमध्ये




सुधारणा सुचवणे आणि खेळाडूंचे अधिवेशन भरवून त्यांच्या अडीअडचणी सरकारपर्यंत पोहोचवणे.

या बैठकीला क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. या बैठकीला क्रीडा समुपदेशक श्रीमती जयश्री खिलारी, जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील, शिव छत्रपती पुरस्कार विजेते अशोक दुधारे, शिव छत्रपती पुरस्कार विजेते आणि आंतरराष्ट्रीय कबड्डी कोच शैलजा जैन, खोखो क्रीडा संघटक श्री मंदार देशमुख, शिव छत्रपती पुरस्कार विजेते आनंद खरे, आंतरराष्ट्रीय धावपटू मोनिका अथरे, प्रा हेमंत पाटील, रिटायर्ड विंग कमांडर प्रदीप बागमार, प्रा. दीपक जुंद्रे, बॅडमिंटन कोच मकरंद देव, डॉ दिपक क्षत्रिय, हेमंत काळे, फिजिओथेरपिस्ट डॉ. नील शहा, थलेटिक्स कोच सिद्धार्थ वाघ, बॅडमिंटन संघटक अनंत जोशी, विलास गायकवाड, आदिवासी विकास विभागाच्या जयश्री जेजुरकर, क्रीडा पत्रकार फणींद्र मंडलिक, माजी अधिक्षक, जिल्हा न्यायालय दीपक मोरवाल, प्रा हेमंत काळे, आदिवासी क्षेत्रात क्रीडा मार्गदर्शक दिनेश पागी, इंजी. नरेंद्र बिरार, अंकिता धेरमले, उपप्राचार्य आणि कौन्सेलर संगीता पवार, सायक्लिस्ट स्नेहल देव, अधिक्षक आदिवासी विकास विभाग अरुण बगले, हिरामण टोपले, आदिवासी भागात खेळाडू कार्यकर्ता संजय गवळी, विशाल भुसारे, श्री भूषण पाटील, कामिनी केवट, सुनील गायकवाड, इंज श्री विजय खटोड, तालुका क्रीडा अधिकारी अविनाश टिळे, आंतरराष्ट्रीय डिफ क्रिकेटर सुदिश नायर, बास्केटबॉल खेळाडू दीपशिखा रे आदी प्रतिनिधींनी या मोहिमेत सहभाग दर्शवला आहे. या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत माजी जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक यांनी महाराष्ट्र क्रीडा विकास प्रतिष्ठान च्या स्थापनेचा संकल्प मांडला. भविष्यातील वाटचाल सी.एस. आर. निधी आणि विविध संस्थांशी सामंजस्य करार करून खेळाडूंना आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याचा मानस रवींद्र नाईक यांनी व्यक्त केला. खेळाडूंचे कौन्सिलिंग आणि क्रीडा मार्गदर्शकांसाठी ट्रेन द ट्रेनर हा उपक्रम राबवून प्रशिक्षणाचा दर्जा उंचावण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. या बैठकीमुळे महाराष्ट्राच्या क्रीडा विश्वात एक नवीन आणि सकारात्मक पाऊल पडले असल्याचे बोलले जात आहे.

## पत्रकार भगवान साळवे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेडराजा : आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांना तातडीने मदत मिळावी आणि प्रकरणांचा विलंब कमी व्हावा या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने जिल्हास्तरीय समितीचे पुनर्गठन करत त्याच धर्तीवर तालुकास्तरीय समित्यांचे गठन करण्याचा निर्णय घेतला आहे. या नव्या समितीत पत्रकार भगवान साळवे यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना तातडीने आर्थिक मदत, सामाजिक सुरक्षा आणि विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर समित्या कार्यरत राहणार आहेत.

यापूर्वी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत दिली जात होती; मात्र आता नियमित अर्थसंकल्पातून निधी उपलब्ध करून मदत देण्यात येणार आहे. अभ्यास समितीच्या शिफारशीनुसार प्रक्रियेमधील विलंब टाळण्यासाठी समितीच्या संरचनेत बदल करण्यात आले आहेत.

तालुका स्तरीय समितीमध्ये उपविभागीय अधिकारी (डऊच्) अध्यक्ष असतील, तर तहसीलदार सदस्य सचिव म्हणून काम पाहतील. याशिवाय गटविकास अधिकारी, पोलीस निरीक्षक, तालुका वैद्यकीय अधिकारी, आरोग्य अधिकारी, सहायक निबंधक सहकारी संस्था, अग्रणी बँक प्रतिनिधी, पशुसंवर्धन अधिकारी, शेतकरी प्रतिनिधी आणि सामाजिक संस्थेचा प्रतिनिधी यांचा समावेश करण्यात आला आहे. पत्रकार भगवान साळवे यांची या समितीवर सदस्य म्हणून नियुक्ती झाल्याने सिंदखेडराजा तालुक्यातील शेतकरी आणि सामाजिक क्षेत्रातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. या समितीवर सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल ते आपल्या नियुक्तीचे श्रेय आमदार मनोज कायंदे बळीवंश चे नितीन कायंदे यांना देतात शेतकरी आत्महत्या प्रकरणांमध्ये तातडीने मदत आणि प्रभावी समन्वय साधण्यासाठी ही समिती महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

### धाराशिव जिल्हा जात पडताळणी कार्यालयात सुनावणी दरम्यान विद्यार्थ्यांची व पालकांची एकच गर्दी

# अनेक विद्यार्थ्यांचे जात पडताळणी प्रस्ताव चार-पाच महिन्यापासून प्रलंबित; कर्मचारी यांची बेजबाबदार उत्तरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस. के. गायकवाड): वेळच्या वेळी सुनावणी न झाल्यामुळे दि.१३ मे२०२६ रोजी धाराशिव जिल्हा जात पडताळणी कार्यल्यात झालेल्या सुनावणी दरम्यान विद्यार्थ्यांची व पालकांची एकच गर्दी झाल्याचे दिसून आले.अनेक विद्याथ्यांचे जात पडताळणी अर्ज गेली तीन-चार महिने पेंडिंग असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.असी चिंताजनक चर्चा विद्यार्थी व पालकालून होत असून शालेय विद्यार्थ्यांचे जात पडताळणीचे प्रस्ताव तातडीने निकाली काढण्यात यावे अशी मागणी लाभार्थी विद्यार्थी व पालकांमधून होत आहे.

.सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता बारावी विज्ञान मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या पुढील व्यावसायिक शिक्षणासाठी उदारणार्थ मेडिकल, पॉलिटेक्निकल आभियांत्रिकी वगैरे प्रवेशासाठी जात पडताळणीची गरज असते म्हणून त्यांनी नोव्हेंबर-डिसेंबर २२५ मध्ये संबंधित कॉलेज मार्फत जात पडताळणीसाठी धाराशिव जिल्हा जात पडताळणी कार्यालयात अर्ज दाखल केले खरे पण त्या अर्जावर अध्यापक वेळच्या वेळी कार्यवाही किंवा सुनावणी झाली नाही त्यामुळे काही विद्यार्थ्यांचे प्रस्ताव अद्याप पेंडिंग (प्रलंबित )आहेत तर काहीना अतां त्रुटीचे संदेश पाठविले जात आहेत.या संदर्भात पोच पावती घेऊन संबधिताकडे चौकशी केली असता पडताळणी झालेली आहे पण कधी अपलोड करून लाभार्थी विद्यार्थ्याकडे पाठविण्यात येईल हे सांगता येत नाही. अपलोड करायचे बाकी आहे अपलोड कधी होणार आणि तुम्हाला तुमच्या मेलवर कधी मिळणार हे सांगता येणार नाही अशी बे जबाबदार उत्तरे येथील संबंधित कर्मचारी देतात असे समजते





त्यामुळे अनेक विद्यार्थी संभ्रमात पडलेले आहेत कारण इयत्ता दहावी व बारावी परीक्षा निकाल लागला असून दहावीनंतर पॉलिटेक्निकल आयटीआय वगैरे व्यवसायिक प्रवेशासाठी विद्यार्थी प्रयत्न करत असतात तर बारावी विज्ञान नंतर काही विद्यार्थी मेडिकल इंजिनिअरिंगसाठी प्रवेश मिळवण्याकरिता प्रयत्न करतात.त्यासाठी त्यांना जात पडताळणी दाखल्याची अत्यंत गरज असते.जर वेळेत हे दाखले नाही मिळाले तर कदाचित त्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होऊ शकते.त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात असल्याचे दिसून येत आहे.त्यामुळे पुढील शिक्षणासाठी प्रवेश मिळेल का नाही या चिंतेत अनेक विद्यार्थी असल्याचे समजते. तेव्हा संबंधित जात पडताळणी कार्यालयाने.किमान दर आठवड्याला एकदा सुनावणी ठेवून विद्यार्थ्यांचे जात पडताळणी प्रस्ताव त्वरीत निकाली काढावे.कारण लवकरच पुढील शिक्षणासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू होईल तत्पूर्वी विद्यार्थ्यांना जात पडताळणी दाखला मिळाला पाहिजे. बऱ्याच विद्यार्थ्यांनी कुटुंबातले रक्त नात्यातिल जात पडताळणी झालेला दाखला पुरावा म्हणून जोडलेला असताना सुद्धा संबंधित अधिकाऱ्यांनी अधिक पुरावे दाखल करा अशी टिपणी टाकून अनेक विद्यार्थ्यांचे जात पडताळणी प्रस्ताव रिजेक्ट केल्याचेही समज 'तरी ज्या विद्यार्थ्यांनी रक्त नात्यातील जात पडताळणीचा दाखला पुरावा म्हणून जर आपल्या प्रस्तावाबरोबर सादर केला असेल तर अशा विद्यार्थ्यांना कसल्याही प्रकारची जाचक अट न लावता त्यांना दाखला देण्यात यावा अशी मागणी विद्यार्थ्यी व पालकांमधून होत आहे.

धाराशिव जिल्ह्यातील जात पडताळणी कार्यालयाच्या बेजबाबदार कारभार वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळावे व विद्यार्थ्यांना वेळेत जात पडताळणी दाखले द्यावेत अशी मागणी सुनावणी दरम्यान उपस्थित पालक व विद्यार्थी वर्गातून होत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, अक्कलकोटच्या वतीने तहसीलदारांना निवेदन

## संजयजी भोकरे यांना झेड प्लस' सुरक्षा द्यावी : कमलाकर सोनकांबळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे व सांगली येथील अंबाबाई तालीम संस्थेचे अध्यक्ष संजयजी भोकरे यांच्या हत्येचा कट पोलिसांनी उधळून लावल्याने राज्यात खळबळ माजली आहे.या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, राज्य शासनाने त्यांना तातडीने 'झेड प्लस' (न+) दर्जाचे पोलीस संरक्षण पुरवावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ अक्कलकोटच्या वतीने राज्याच्या गृहमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

**संजयजी भोकरे यांच्या जीविताला असलेला धोका पाहता त्यांना तात्काळ 'झेड प्लस' सुरक्षा प्रदान करावी. सिद्धार्थ भोकरे यांना मिळालेली धमकी आणि सध्याचा कट यांचा परस्परांशी संबंध आहे का, याची सखोल चौकशी व्हावी.या कटामागील मुख्य 'बोलवता धनी' कोण आहे, याचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करावी.राज्याच्या गृहमंत्र्यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन पत्रकारितेतील एका ज्येष्ठ व्यक्तीला आणि त्यांच्या कुटुंबाला कडेकोट सुरक्षा पुरवावी**

**– कमलाकर सोनकांबळे**
**अध्यक्ष –महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ अक्कलकोट**

सांगली पोलिसांनी नुकतीच धडाकेबाज कारवाई करत संजयजी भोकरे यांच्या हत्येचा मोठा कट उधळून लावला आहे.या प्रकरणात पोलिसांनी तीन संशयित आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून दोन देशी बनावटीची पिस्तूलं चार जिवंत काडतूसं धारदार शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत.

भोकरे यांना 'प्लॅन बी' नुसार पुन्हा हल्ला होण्याची दाट शक्यता आहे. तरी राज्य शासनाने त्यांना तातडीने 'झेड प्लस' (न+) दर्जाचे पोलीस संरक्षण पुरवावे या मागणीचे निवेदन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अध्यक्ष कमलाकर सोनकांबळे यांच्या अध्यक्षतेखाली तहसीलदार विनायक मगर यांच्याकडे देण्यात आली.यावेळी सचिव विश्वनाथ चव्हाण, पत्रकार बसवराज बिराजदार, पत्रकार चेतन जाधव, पत्रकार समाधान अहिरे, पत्रकार दयानंद दणुरे, पत्रकार अभिजीत पतकी, पत्रकार महेश गायकवाड, पत्रकार गौतम बाळशंकर, पत्रकार रेवणसिद्ध पुजारी, पत्रकार गणेश भालेराव, पत्रकार निंगाप्पा निंबाळ यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते.

**संजय भोकरे यांच्यासारख्या ज्येष्ठ पत्रकाराला जीवे मारण्याचा कट रचला जाणे, ही लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर झालेली मोठी टांगती तलवार आहे. पोलिसांनी हा कट उधळून लावून मोठे अनर्थ टाळले असले, तरी ही घटना पत्रकारितेसाठी अत्यंत धक्कादायक आणि चिंताजनक आहे.राज्यात 'पत्रकार संरक्षण कायदा' अस्तित्वात असूनही अशा घटना घडणे दुर्दैवी आहे.या कायद्याची अधिक कडक अंमलबजावणी करून पत्रकारांना सुरक्षित वातावरण निर्माण करून देणे ही सरकारची जबाबदारी आहे.**

**लेखणीवर होणारा हल्ला हा विचारांवर होणारा हल्ला आहे. शासनाने वेळीच पावले उचलून गुन्हेगारांमध्ये कायद्याचा धाक निर्माण करावा.**

**– विश्वनाथ चव्हाण**
**सचिव,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ अक्कलकोट**




## सुंदरपूर येथे कृषी विभागाकडून 'बीज उगवण क्षमता' चाचणी संपन्न; नवरदेवाच्या हस्ते झाले अनोखे प्रात्यक्षिक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी :खरीप हंगाम तोंडावर असताना शेतकऱ्यांनी घरी असलेल्या बियाण्यांची पेरणीपूर्वी तपासणी करणे अत्यंत आवश्यक असते. याच उद्देशाने आज सुंदरपूर येथे कृषी विभागाच्या वतीने 'बीज उगवण क्षमता चाचणी' मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी गावातील एका विवाह सोहळ्याचे औचित्य साधून चक्क नवरदेवाच्या हस्ते बियाणे उगवण चाचणीचे प्रात्यक्षिक करण्यात आले. विवाह सोहळ्यात कृषी प्रबोधन शेती आणि माती–शी असलेले नाते अधोरेखित करण्यासाठी सुंदरपूर येथील या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. लग्नाच्या धामधुमीतही शेतकऱ्यांनी आपल्या शेतीकडे दुर्लक्ष करू नये आणि पेरणीपूर्वी घरच्या बियाण्यांची खात्री करून घ्यावी, हा संदेश यातून देण्यात आला. नवरदेवाने स्वतः पारंपरिक पद्धतीने पोत्याच्या साह्याने बियाणे मांडून ही चाचणी कशी करावी, याचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

याप्रसंगी उपस्थित मंडळ कृषी अधिकारी जे आर क्षीरसागर यांनी ग्रामस्थांना सविस्तर मार्गदर्शन केले.

बचत :–घरचे बियाणे वापरल्यामुळे बियाण्यांवरील खर्चात मोठी बचत होते.

खात्री:–पेरणीनंतर बियाणे न उगवल्यास होणारे आर्थिक नुकसान टाळता येते.

प्रमाण:–१०० पैकी किमान ७० ते ८० दाणे उगवले तरच ते बियाणे पेरणीसाठी योग्य समजावे.अशी करा चाचणी (थोडक्यात):–

१. एका गोणपाटावर किंवा जाड कागदावर ओलावा निर्माण करावा.

२. त्यावर निवडक १०० बियांच्या ओळी मांडाव्यात.

३. ४ ते ५ दिवसांनंतर किती बियाण्यांना मोड आले आहेत, याची मोजणी करावी.

यावेळी गावचे सरपंच विजय सोमवंशी, प्रतिष्ठित नागरिक अनिल सोमवंशी, संदिप सोमवंशी, संतोष सोमवंशी, शामराव सोमवंशी प्रगतशील शेतकरी आणिसहायक कृषी अधिकारी योगेश पाटील कर्मचारी उप–स्थित होते. चिरंजीव जालिंदर गांगुर्डे नवरदेवाच्या हस्ते पार पडलेल्या या अनोख्या उपक्रमामुळे सर्वत्र कौतुक होत आहे

# निफाडला राष्ट्रीय नाथ संमेलनाचा समारोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नाथ संमेलनाचा समारोप नाही तर ही नाथांच्या सेवेची सुरुवात आहे.हे कार्य गावोगावी व्हावे अशी अपेक्षा व्यक्त करत काही महिन्यांपासून प्रतिकूल घटना घडत आहे.या घटनापासून आपल्याला संरक्षण मिळण्यासाठी श्री नवनाथांची सेवा फलदायी आहे,नाथ हे संरक्षक आहे.सध्या तापमानात मोठी वाढ झाली आहे. देशात दिवसेंदिवस तापमान वाढत आहे. त्याला मानव जबाबदार आहोत सेंद्रिय किंवा आयुर्वेदिक शेती करावी असे आवाहन श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचे प्रमुख गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांनी केले.




त्र्यंबकेश्वर येथील अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ आणि निफाड येथील श्री स्वामी समर्थ केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने निफाड येथे आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय नाथ संमेलनाच्या दुसऱ्या दिवशो गुरुमाऊली आण्णासाहेब मोरे बोलत होते.प्रमुख अतिथी म्हणून आमदार दिलीप बनकर,नगराध्यक्ष कांताबाई कर्डीले,पंढरीनाथ थोरे,सोनिया होळकर,सुवर्णा जगताप,पूनम होळकर, लक्ष्मणनाथ महाराज , संदीप सुराणा,रामप्रभु महाराज,गणेशगिरी महाराज,राजेंद्र राठी,रतन पाटील वडघुले,,मिलिंद चवंडके,कैलास सोनवणे, मधुकर राऊत,विश्वास कराड, आदी उपस्थित होते.

**श्री नवनाथांची सेवा फलदायी आहे, आणि नाथ हे संरक्षक आहेत, प.पू. आण्णासाहेब मोरे**

स्वागताध्यक्ष वि. दा. व्यवहारे सर यांनी प्रास्ताविक केले.हजारो महिलांनी श्री नवनाथ संकलित ग्रंथाचे सामुदायिक पारायण केले. संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी मिलिंद चवंडके यांचे महाराष्ट्रातील नाथसंप्रदाय , श्री ब्रह्मानंद स्वामी यांचे नवनाथांची चमत्कार शक्ती आणि त्यामागचे तत्वज्ञान , टी एन परदेशी यांचे गोरक्षनाथांची गुरुभक्ती या विषयावर , श्रीपाद कुलकर्णी यांचे नाथसंप्रदाय आणि वारकरी संप्रदाय या विषयावर मार्गदर्शन व्याख्याने झाली.मुकुंद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले सुभाष खाटेकर यांनी आभार मानले. श्रीमती योगिता निगळ यांनी पसायदान म्हटले

**संमेलनात केलेले ठराव**

१)निफाड व परिसराला ब वर्ग पर्यटन तीर्थ स्थळ दर्जा मिळावा.

२)प्रत्येक वर्षी नाथांच्या साहित्यावर आधारित संमेलन आयोजित करावे.

३)पर्यावरण व जल संरक्षण अभियान राबविणे.

४)महाराष्ट्रातील नवनाथांच्या ९ स्थळांना अध्यात्मिक पर्यटन व तीर्थस्थळ दर्जा मिळावा.

## जिल्ह्यात कायमस्वरूपी कृती टीम स्थापनेचेआदेश, महसूल मंत्र्यांनी दिले सर्व अधिकाऱ्यांना आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : अप्पर आयुक्त (महसूल) तथा पदसिद्ध विशेष कार्य अधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय कक्ष कोकण विभाग यांचेकडील आदेशाने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी वर्षाचे ३६५ दिवस कायमस्वरूपी जलद कृती टीम स्थापन करण्याबाबतचे आदेश महापालिका आयुक्त, ठाणे, नवी मुंबई, मीरा–भाईंदर, कल्याण डोंबिवली, भिवंडी व उल्हासनगर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे, पोलीस आयुक्त ठाणे, कार्यकारी अभियंता, पीडब्ल्यूडी, सर्व तहसीलदार व सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती व्यवस्थापक, टोरेंट पॉवर लिमिटेड, उपनियमक, नागरी संरक्षण दल, ठाणे यांना आदेश निर्गमित केले आहेत.

राष्ट्रीय मानव हक्क मंचचे अध्यक्ष शरद धुमाळ यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे ठाणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील शहरी तथा ग्रामीण भागातील आगी, पावसाळी आपत्ती, नैसर्गिक व मानवनिर्मिती आपत्तीच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २०४५ नुसार वर्षाचे ३६५ दिवस कायमस्वरूपी जलद कृती टीम स्थापन करण्याबाबत निवेदन सादर केले होते. त्यामुळे अध्यक्षांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

**हेलिकॅप्टरने येणार संतांच्या पादुका**

**विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन**

# 'अधिकमास' निमित्त पंढरीत रंगणार संत नामदेव गाथा पारायण सोहळा


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : राज्यभरातील विविध वारकऱ्यांनी एकत्र येत तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे अधिकमास निमित्त संत नामदेव महाराज गाथा पारायणासह विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर सप्ताह निमित्त भाविकांच्या दर्शनासाठी विविध संतांच्या पादुका हेलिकॅप्टरने आणल्या जाणार आहेत.

चंद्रभागा नदीच्या पैलतिरावरील ६५ एकर परिसरात दि.१७ ते २४ मे या काळात सदर सप्ताह होणार आहे. येथे धार्मिक कार्यक्रमांची मेजवानी होणार असून शनिवार दि.१६ मे रोजी दुपारी ३ ते ५ दरम्यान संत तुकाराम महाराज यांच्या व विविध संतांच्या पादुका हेलिकॅप्टरने दर्शनासाठी आणल्या जाणार आहेत.

येणारा पुरुषोत्तम मास अर्थात अधिक मासनिमित्त तसेच संत ज्ञानेश्वर महाराज यांचा ७५० वा जन्मोत्सव, संत नामदेव महाराज, संत जनाबाई आदी १४ संतांचा ७७५ वा समाधी सोहळा, जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या सदेह वैकुंठगमन सोहळ्यास ३७५ वर्ष झाल्यानिमित्त, संत सावता महाराज यांचा ७७५ वा जन्मोत्सव, संत जनार्दनपंत देशपांडे यांचा ४५० वा समाधी सोहळा तसेच नारायण महाराज देहूकर यांच्या ३७५ व्या जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त सदर अखंड हरिनाम सप्ताह व संगीत संत नामदेव गाथा पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये रोज पहाटे चार ते सहा काकडा भजन, सकाळी सहा ते अकरा नामदेव गाथा पारायण, ११ ते साडेबारा कीर्तन, दुपारी एक ते तीन भोजन, दुपारी तीन ते साडेतीन हरिपाठ, साडेतीन ते साडेपाच संत नामदेव महाराज जीवन चरित्र कथा, सायंकाळी सहा ते आठ कीर्तन व रात्री आठ ते दहा हरिजागर होणार आहे.

सप्ताहामध्ये रोज सकाळी ११ ते १२:३० व सायंकाळी सहा ते आठ प्रवचन होणार आहे. यामध्ये शनिवार १६ मे रोजी राणा महाराज वासकर, रविवार १७ मे रोजी सुधाकर महाराज इंगळे व चैतन्य महाराज देगलूरकर, सोमवार प्रभुराज महाराज वासकर, कृष्णा महाराज चवरे, मंगळवार भागवत महाराज शिरवळकर, बाळासाहेब महाराज देहूकर, बुधवार श्रीराम महाराज झिंजुर्के, बंडातात्या महाराज कराडकर, गुरुवार माधव महाराज नामदास, शुक्रवार नामदेव महाराज लबडे, शनिवार २३ रोजी ज्ञानेश्वर माउली महाराज कदम यांचे कीर्तन व रविवार २४ मे रोजी काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे.







**सोहळ्याचे वैशिष्ट्य**

या सोहळ्यामध्ये ३७५ धर्मध्वजधारी, ३७५ कलशधारी, ३७५ तुळशीधारी, ३७५ कीर्तनकार, ३७५ टाळकरी, मृदुंगसेवक, ब्रह्मविणाधारी, चोपदार तसेच संत तुकाराम नावाच्या व्यक्ती, ७५० संत ज्ञानेश्वर नावाच्या व्यक्ती, ६७५ संत नामदेव नावाच्या व्यक्ती, ६७५ संत जनाबाई नावाच्या महिला सहभागी होणार आहेत. यासह रोज ११ हजार गाथावाचक १००० टाळकरी २४ तास अखंड भजन प्रहरा राहणार आहे. सोहळ्याच्या समाप्ती दिवशी अर्थात रविवार २४ रोजी एक लाख भाविकांना पुरणपोळीचे भोजन दिले जाणार आहे.

## मंगरूळे हायस्कूलची शांभवी आजगुंडे हिची राज्यस्तरावर झेप; दहावीत ९६.४० टक्के

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : जिद्द, चिकाटी आणि स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर यश संपादन करता येते, हे सिद्ध करत मांगरूळे येथील कु. शांभवी रामणप्पा आजगुंडे हिने दहावीच्या शालांत परीक्षेत ९६.४० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. मांगरूळे हायस्कूलमध्ये शिक्षण घेत असलेल्या शांभवीने शाळेत द्वितीय क्रमांक तर केंद्रात प्रथम क्रमांक पटकावत आपल्या गुणवत्तेची छाप उमटवली आहे. विशेष म्हणजे कोणत्याही खासगी ट्युशनचा आधार न घेता तिने हे यश मिळवले आहे.



शांभवी ही केवळ अभ्यासातच नव्हे तर विज्ञान, क्रीडा, सांस्कृतिक आणि कला क्षेत्रातही बहुआयामी कामगिरी करणारी विद्यार्थिनी म्हणून ओळखली जाते. गेल्या वर्षी झालेल्या 'इन्स्पायर अवॉर्ड' स्पर्धेत तिच्या अभिनव विज्ञान प्रकल्पाची तालुकास्तरावर निवड झाली होती. त्यानंतर सोलापूर येथे झालेल्या स्पर्धेतही तिने यश मिळवत पुढील फेरी गाठली. पुढे भंडारा येथे आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेत तिच्या प्रकल्पाची निवड झाली असून अक्कलकोट तालुक्यातून राष्ट्रीय स्तरासाठी निवड झालेली ती एकमेव विद्यार्थिनी ठरली आहे. आता दिल्ली येथे होणाऱ्या देशपातळीवरील 'इन्स्पायर अवॉर्ड' स्पर्धेसाठीही तिची निवड झाली आहे.

महिला, मुली तसेच वृद्ध व्यक्तींच्या सुरक्षेसाठी शांभवीने एक विशेष सेफ्टी गॅजेट विकसित केले आहे. प्रवासादरम्यान महिलांच्या सुरक्षेसाठी हे गॅजेट उपयुक्त ठरणार असल्याचे सांगितले जात आहे. तिच्या या अभिनव संशोधनाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून या प्रकल्पाचे प्रकाशनही झाले आहे. याचबरोबर या संशोधनासाठी पेटंट मिळविण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे.

शैक्षणिक क्षेत्राबरोबरच शांभवीने क्रीडा क्षेत्रातही आपली चमक दाखवली आहे. शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये तिने राज्यस्तरापर्यंत मजल मारली आहे. कथक नृत्य, संगीत आणि बुद्धिबळ स्पर्धांमध्येही तिने अनेक पदके मिळवली असून विविध विज्ञान स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे.

शांभवी ही शिक्षक कुटुंबातील कन्या असून तिचे वडील श्रीकाशी विश्वेश्वर हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. तर तिची आई सौ. प्रियांका आजगुंडे या मांगरूळे हायस्कूलमध्ये शिक्षिका आहेत. आई–वडिलांचे मार्गदर्शन, शिक्षकांचे सहकार्य आणि स्वतःच्या सातत्यपूर्ण परिश्रमाच्या जोरावर तिने हे यश संपादन केले आहे.

कु. शांभवी आजगुंडे हिच्या या सर्वांगीण यशाबद्दल शैक्षणिक, सामाजिक व विविध क्षेत्रांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

# आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या विशेष प्रयत्नांतून सांगोला तालुक्यातील ५ ग्रामपंचायतींना इमारत निधी मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला : ग्रामपंचायत प्रशासनाचा कार्यभार व्यवस्थित पार पाडण्यासाठी ग्राम पंचायतींना नवीन इमारतीची आवश्यकता होती.सांगोला विधानसभा मतदारसंघातील सोनके व तिप्पेहळ्ळी ग्राम पंचायतींना प्रत्येकी २५ लाख आणि आगलावेवाडी,हटकर मंगेवाडीआणि सोनलवाडी यांना प्रत्येकी २० लाख असे पाच ग्रामपंचायतींना मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्राम पंचायत बांधणी योजनेंतर्गत नविन ग्रामपंचायत इमारत बांधण्यासाठी एकूण १ कोटी १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या मागणीला यश मिळाले आहे.

ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व प्रशासकीय अधिकार्यांना गा-वचा कारभार पाहताना येणार्या अडचणी दूर व्हाव्या, यासाठी मतदार संघातील ५ ग्रामपंचायत कार्यालयांच्या नूतन इमारतीसाठी आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी प्रत्येकी २५ लाख रुपयांचा निधी मिळवून दिला आहे.

मतदार संघाच्या सर्वांगिण विकासाला गती देवून, शासकीय कार्यालयांचा देखील विकास करण्यावर आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी भर दिला आहे. यामुळे प्रशासकीय अधिकार्यांची मोठी अडचण दूर होवून, नागरिकांना सेवा मिळण्याची सुविधा निर्माण झाली आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामविकास तथा पंचायतराज मंत्री व सोल-ापूर जिल्हा पालकमंत्री मा.श्री. जयकुमारजी गोरे यांच्या कडे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी ग्रामपंचायतींना इमारत बांधण्यासाठी निधी उप-लब्ध करून द्यावा ही मागणी अधिवेशनापूर्वी केली होती. या मागणीची दखल घेत ग्रामविकास मंत्री मा.ना.जयकुमार गोरे यांनी तत्काळ या ग्रामपंचायतींना मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गतनिधी मंजूर केला असून निधी मंजूर केल्याबद्दल आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी मंत्री महोदयांचे आभार मानले.

ग्रामपंचायतींच्या नूतन इमारतींना प्रशासकीय मान्यता मिळाल्यामुळे नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. निधी मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, यांच्यासह ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्हा पालकमंत्री मा.ना.जयकुमार गोरे यांचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी आभार मानले.

# लाचलुचपत प्रतिबंधक अधिकाऱ्यांची कळंबमध्ये मोठी कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : कळंब येथे रिलॅक्स स्पा सेंटरचा व्यवसाय सुरळीत चालू ठेवण्यासाठी ४० हजार रुपयांची लाच मागुन ३६ हजार रुपये लाच घेताना २ पोलिस अंमलदार यांना रंगेहात पकडण्यात आल्याने पोलिस दलात खळबळ उडाली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागात जालना येथील पोलिस उप अधीक्षक बाळू संपती जाधवर यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलिस अंमलदार अशोक दाद-राव करवर व सिद्धेश्वर प्रकाश शिंदे या २ आरोपी विरोधात गुन्हा नोंद करून त्यांना अटक केली आहे.





तक्रारदार यांचा कळंब येथे रिलॅक्स स्पा सेंटरचा व्यवसाय असून तो सुरळीत चालू ठेवण्यासाठी पोलिस अंमलदार सिद्धेश्वर शिंदे हे पोलिस निरीक्षक यांचेसाठी २० हजार रुपये व पोलिस अंमलदार अश-ोक करवर हे दुय्यम अधिकारी यांचेसाठी २० हजार असा ४० हजार रुपयांचा हप्ता लाच म्हणुन मागितला.

यावरून तक्रारदार यांनी अधिकारी यांना भेटण्याची दोन्ही लोकसेवकांकडे इच्छा व्यक्त केली असता लोकसेवकांनी तक्रारदार यांना सांगितले की तू जर अधिकारी यांना भेटलास तर ते तुझा स्पाचा धंदा बंद करून तुझ्यावर कारवाई करण्यास लावतील, तुझा धंदा सुरळीत चालवायचा असेल तर आम्हाला हप्ता द्यावा लागेल व त्या विषयी जर काही बोलायचे असेल तर ते आमच्या दोघांशी बोलावे ला-गेल असे सांगितले.

तक्रारदार हे पंच यांचे सोबत बागवान चौक कळंब येथे गेले असता तेथे लोकसेवक सिद्धेश्वर शिंदे यांनी पोलिस निरीक्षक यांचेसाठी २० हजार व लोकसेवक अशोक करवर यांनी दुय्यम अधिकारी यांचेसाठी १६ हजार रुपये असे एकूण दोघांनी मिळून ३६ हजार रुपये लाचेची मागणी करून ती स्वीकारण्याचे पंचासमक्ष कबुल केले, त्यानंतर सापळा लावुन कळंब शहरा-तील होळकर चौकातुन तांदळवाडीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला असलेल्या हॉटेल गुलमोहर बिर्याणी हाऊस समोर तक्रारदाराच्या स्विफ्ट कारमध्ये लाचेच्या रकमेसह ताब्यात घेतले.

माधुरी केदार कांगणे पो-लीस अधीक्षक व शशिकांत सिंगारे, अपर पोलीस अधीक्षक छत्रपती संभाजीनगर यांच्या म ार्गदर्शनाखाली तपास अधिकारी विजय वगरे पोलिस निरीक्षक ला.प्र.वि. धाराशिव हे तपास करीत आहेत. सापळा पथकात पोहेका गजानन घायवट, पोअंमलदार मनोहर भुतेकर, गणेश चेके, संदीपान लहाने, गजानन कांबळे, चालक पी हवा भालचंद्र बिनोरकर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना यांचा समावेश होता.

# वस्तू व औषधावर मनमानी छापील किंमत ग्राहक पंचायतीचे आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : विविध कंपन्या औषधांवर वस्तूवर मनम ानी छापील किंमत टाकली जात आहे. त्यामुळे ग्राहकांची आर्थिक लूट होत आहे त्यामुळे ग्राहकांची आर्थिक लोक होत आहे त्यामुळे वस्तूवर औषधावर योग्य किंमत छापण्यात यावी अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायत समितीने करण्यात आले आहे. याबाबतचे निवेदन पंढरपूर येथील प्रांताधिकारी व तहसीलदार यांना देण्यात आले आहे.

सध्या दिवसेंदिवस महागाई वाढत आहे त्यामुळे जेवण जगण्याची नागरिकांना संघर्ष करावा लागत आहे असे असताना विविध वस्तू व औषधावर मनम ानी किमती छापल्या जात आहेत त्यामुळे याचा फटका नागरिकांना बसत आहे याची आर्थिक लूट केली जात आहे त्यामुळे नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. विविध वस्तू व औषधावर योग्य किंमत अस-ावी अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतने केली आहे या पार्श्वभूमीवर देशभर निवेदन देण्याचे आंदोलन करण्यात आले व पंढरपूर येथील प्रांताधिकारी व तहसीलदार कार्यालय येथे ग्राहक पंचायतीचे श्वास निघते नंदकुमार देशपांडे विनय उपाध्ये मंगेश देशपांडे शशिकांत सुगंधी, महेश भोसले निवेदन देण्यात आले व हे निवेदन पंतप्रधानापर्यंत पाठवण्यात यावे असे सांगण्यात आले.

# चौदाशे एकर क्षेत्रावर उभारणार औद्योगिक वसाहत, मा.आ. राम सातपुते आणि रणजीत शिंदे यांच्या प्रयत्नांना यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





पंढरपूर/प्रतिनिधी : म ाळशिरस तालुक्यातील श्रीपुर महा परिसरात औद्योगिक क्षेत्र व एमआयडीसी स्थापन करण्याच्या दृष्टीने शासनाच्या वतीने पहिला शासकीय सर्वे करण्यात आला, माळशिरस तालुक्यातील शेती महामंडळाच्या जमिनीवर औद्योगिक विकासाची शक्यता तपासणीसाठी संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळ पाणी करून प्राथमिक अहवाल तयार केला आहे.

तालुक्याचे माजी आमदार राम सातपुते तसेच सोलापूर जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे आणि माळशिरस १०० ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजच्या पदाधिकाऱ्यांनी औद्योगिक मंत्र्यांच्या कडे श्रीपूर मळा येथे एम आयडीसी स्थापन करण्याबाबत पाठपुरावा केला होता त्यानुसार औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी दौरा केला व या पाहणी मध्ये एमआयडीसी सोलापूरचे प्रादेशिक अधिकारी शिव-ाजी राठोड उभा अभियंता प्रदीप खंदारे प्रमुख मापक सारंग साबळे भारत भांजी तसेच शेती महामंडळाची अकाउंटंट राजेंद्र काशीद यांनी सहभाग घेतला व अधिकाऱ्यांनी माळून श्रीपुर बोर-गाव जांभूळ व मिरी या परिसरात शेती महामंडळाच्या गटावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

डी १९ रोड लगत बोरगाव व श्रीपुर हद्दीत सुमारे ३०० एकर क्षेत्रासंबळू व जांभूळ परिसरातील सुमारे ८०० एकर क्षेत्राची पाहणी करण्यात आली माळशिरस चेंबर ऑफ कॉमर्स कडून शासनाला पाठवण्यात आलेल्या पत्रात म हाळुंग येथील ३४८.५५ हेक्टर जांभूळ येथील १३८.६७ बोरगाव येथील ६९.३२ हेक्टर असे एकूण ५५६ हेक्टर पॉईंट ५४ हेक्टर क्षेत्र एमआयडीसीसाठी मागणी करण्यात आलेली आहे.

या प्रस्तावामध्ये औद्योगिक पार्क इंजिनिअरिंग हब लॉजिस्टिक पार्क विकसित करण्याची मागणी करण्यात आली आहे या संदर्भात महाराष्ट्र औद्योगिक विकास म हामंडळ सोलापूर यांनी चार मे रोजी माळशिरस तहसीलदारांना पत्र देखील पाठवले आहे.

# टाकळीवाडी येथील ऑनररी कॅप्टन रमेश निर्मळे यांना शिंदे सेना सैनिक सेवा दल तालुका अध्यक्ष नियुक्तीपत्र

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथे सैनिक महाराष्ट्र राज्य सचिव तथा शिंदे सेना सैनिक सेवा दल महाराष्ट्र राज्य राष्ट्राध्यक्ष ड. सरदार चोपडे यांनी आज शिरोळ तालुक्यातीलटाकळी वाडी येथे शहीद स्मारकाला भेट देऊन शहीद जवानांना अभिवादन केले. यावेळी देशासाठी बलिदान दिलेल्या वीर जवानांच्या स्मृतींना मानवंदना अर्पण करण्यात आली.

याच प्रसंगी शिंदे सेना



सैनिक सेवा दलाच्या शिरोळ तालुका अध्यक्षपदी रमेश निर्मळे यांची नियुक्ती करण्यात आली. ड. सरदार चोपडे यांच्या हस्ते रमेश निर्मळे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी संघटना अधिक बळकट करण्यासाठी कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच माजी सैनिक, सैनिक कुटुंबीय व समाजहिताच्या विविध उपक्रम ांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमास परिसरातील सैनिक, माजी सैनिक केंदबा कांबळे, महादेव बदामे, दादासो खोत, संजय बदामे, भागूजी निर्मळे, कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष संजय माने व कार्यकर्ते उपस्थित होते.

# विश्वास कोकणे यांची राष्ट्रीय जिल्हा पंचायत असोसिएशनच्या जिल्हाध्यक्षपदी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे/खामसवाडी/प्रतिनिधी : राष्ट्रीय जिल्हा पंचायत असोसिएशन या संघटनेच्या धाराशिव जिल्हाध्यक्ष पदी खामसवाडी येथील मा. विश्वास सुमन हनुमंत कोकणे यांची निवड करण्यात आली आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री. कैलास गोरे-पाटील यांनी११ मे २०२६ रोजी नियुक्ती पत्र देऊन ही घोषणा केली आहे.



विश्वास कोकणे हे जिल्हा परिषद गट खामसवाडीचे प्रतिनिधित्व करत आहेत. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद स्तरा-वर त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन संघटनेने त्यांची या पदावर निवड केली आहे.नियुक्ती पत्रात नमूद केल्याप्रमाणे, श्री. कोकणे यांना ११ मे २०२६ पा-सून पुढील नियुक्तीपर्यंत या पदावर कार्यरत राहतील. संघटनेच्या कार्यप्रणालीनुसार संपूर्ण धाराशिव जिल्ह्यासह राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये संघटना बांधणीचे काम जोमाने करण्याची अपेक्षा त्यांच्याकडून व्यक्त करण्यात आली आहे.

या निवडीबद्दल श्री. कैलास गोरे-पाटील यांनी श्री. कोकणे यांचे हार्दिक अभिनंदन केले असून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

राष्ट्रीय जिल्हा पंचायत असोसिएशन ही भारत देशातील जि.प. आणि ता.पं. सदस्यांची प्रमुख संघटना असून हर गांव का विकास...तभी भारत देश झकास...!! हे ब्रीदवाक्य घेऊन कार्यरत आहे. कोकणे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

एका आठवड्यात दुसरा तर दोन महिन्यात सलग चौथा बालविवाह पथकाने रोखला

# निर्भय पथक पंढरपूर विभाग यांना पंढरपूर शहरातील होणारा बालविवाह तात्काळ रोखण्यात यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिनांक १३/०५/२०२६ रोजी पंढरपूर विभागाच्या निर्भय पथकाला मि ळालेल्या माहितीनुसार पंढरपूर विभागामध्ये एका मोठ्या हॉटेलमध्ये बालविवाह होत असल्याचे बातमी मिळाल्याने निर्भय पथकाने सदर ठिकाणी जाऊन तात्काळ चौकशी केली असता मुलगी व तिचे नातेवाईक मिळून आले नातेवाईकांनी विवाह होत असल्याबद्दल नकार दिला. निर्भय पथकाने चौकशी करून त्यांनी छापलेले पत्रिका नातेवाईकांना दाखवा सूक्ष्मोक्ष लावत आता काय थांबवला व ती शिकत असलेल्या शाळेत बोनाफाईड प्रमाणपत्र घेऊन आले असता जे वय वर्षे १७ वर्षे एक महिने दिसून आले. त्यानंतर त्यांचा होणारा विवाह व समज देऊन तात्काळ थांबवण्यात आला. व त्या अल्पवयीन मुलीस बालकल्याण समिती सोलापूर यांच्या समक्ष पुढील कारवाई करता हजर करण्यात आले.

तसेच निर्भया पथक पंढरपूर विभाग पंढरपूर यांनी पंढरपूर शहर व पंढरपूर तालुका व पंढरपूर तसेच करकम पो-लीस ठाणे हद्दीतील सर्व जनतेला आव्हान केले आहे आपल्या हद्दीमध्ये व आपल्या नातेवाईकांमध्ये अशा पद्धतीचे अल्पवयीन विवाह होत असल्यास आम्हास निर्भया पथकास संपर्क करावा. (९११२२२६३५२) यापुढे कोणी अशा बे कायदेशीर कृत्य करेल अशा लोकांवर प्रचलित कायद्यानुसार कायदेशीर कारवाई केली जाईल. अशा लोकांची घाई केली जाणार नाही असेही सांगितले.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मा श्री अतुल कुलकर्णी साहेब, अप्पर पोलीस अधीक्षक माननीय श्री प्रीतम यावलकर सोलापूर ग्रामीण, पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी श्री प्रशांत डगळे साहेब, पंढरपूर शहर पोलीस निरीक्षक श्री दशरथ वाघमोडे पंढरपूर शहर यांच्या मार्गदर्शनाखाली निर्भया पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक सुप्रिया यादव, पोलीस हेड कॉन्स्टेबल बारा छत्तीस शशिकांत सावंत, पोलीस कॉन्स्टेबल १३९५ लक्ष्मण कुचेकर, पोलीस कॉन्स्टेबल तेराशे अकरा निर्मला वाघमारे, पोलीस कॉन्स्टेबल २० ४८ काझी , ७१८ भगत, पोलीस कॉन्स्टेबल २१ १५ चव्हाण यांनी कामगिरी पार पाडले.

# पोलिस विभागाकडून ग्रामपंचायतींना आपत्ती व्यवस्थापन किटचे वाटप





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव : आपत्कालीन परिस्थितीमध्ये गावपातळीवर तातडीने आणि प्रभावी प्रतिसाद देता यावा यासाठी पोलिस विभागाच्या वतीने महत्त्व-पूर्ण पुढाकार घेण्यात आला आहे. दि. १२ मे २०२६ रोजी ग्रामपंचायत कार्यालय, पडघा येथे पडघा, डोहोळे आणि बापगाव ग्राम पंचायतींना आपत्ती व्यवस्थापन किटचे वाटप करण्यात आले.

ठाणे ग्रामीणचे अप्पर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल झाल्टे यांच्या मार्गदर्शनाखाली पडघा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक जितेंद्र ठाकुर यांच्या हस्ते या किटचे वितरण करण्यात आले. नैसर्गिक आपत्तींच्या काळात गाव-पातळीवर प्राथमिक मदत व बचावकार्य तत्काळ सुरू करता यावे, यासाठी या किटमध्ये आवश्यक साहित्याचा समावेश करण्यात आला आहे. विशेषतः पूर, वादळ, आग किंवा इतर आपत्कालीन घटनांमध्ये ग्रामस्थांच्या सुरक्षिततेसाठी ही किट उपयुक्त ठरणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या उपक्रमाम ुळे ग्रामीण भागातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम होण्यास मदत होणार असून स्थानिक प्रशासन आणि पोलीस विभाग यांच्यातील समन्वय अधिक बळकट होणार आहे. कार्यक्रमास संबंधित ग्रामपंचायतींचे ग्रामसेवक, तलाठी, सरपंच, सदस्य तसेच पोलीस कर्मचारी उपस्थित होते.